# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 476/2022 दिनांक : 11.12.2022

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 07.12.2022 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **पाटील यांचे चहाचे दुकानासमोर विजयनगर सिडको, नांदेड येथे**, यातील फिर्यादी व त्याचे मित्र चहाचे दुकानासमोर मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी जमले असता यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचे जवळ येवून तु आमच्याकडे काय बघत आहेस असे म्हणुन त्यांचे कडील तलवार दाखवुन जास्त माज करु नकोस असे धमकावले व तुम्ही महाराज लोक बाहेरुन येवुन येथे माज करत आहात काय हा माझा एरिया आहे येथे औकातीत राहायचे तुझ्या सारख्या महाराजांना मी कधीही मारतो तु जास्त शहाणा झालास असे म्हणुन चापट मारली व नंतर खंजरने फिर्यादीचे बरगडीवर व पोटात तसेच शरीरावर अनेक ठिकाणी मारुन गंभीर जखमी करुन खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी अन्ससिंघ गुरमितसिंघ संधु, वय 18 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. विजयनगर, सिडको, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 728/2022 कलम 307,323,504,506,34 भादवि सह कलम 4/25, 4/27 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री विजय पाटील, मो. नं. 9823155291** हे करीत आहेत.

## 2)दरोडा :–

**किनवट** :–दिनांक 17.05.2022 रोजी 03.00 वा. चे सुमारास, **शेत सर्वे गट नं. 134 मधील टीनशेड व गोदाम मौजे कोठारी ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस झोपतुन उठवून धक्काबुक्की केली व फिर्यादीने ओरडण्याचा प्रयत्न केला असता आरोपीतांनी फिर्यादीचे गळयावर चाकू ठेवून ओरडलास तर खतम करुन टाकतो अशी धमकी दिली तसेच हाथोडीने फिर्यादीच्या मालकी व ताब्यातील गोदामाचे चार कुलूप तोडले व त्यामधील 40 क्विंटल सोयाबीन एका बिना नंबरचे ट्रक मध्ये टाकले तेव्हा फिर्यादीने त्यांना विरोध केला असता आरोपीतांनी फिर्यादीस गडबड केलास तर बघ गोळी घालून ठार करतो असे म्हणत फिर्यादीवर पिस्तोल धरले व पोलीसात तक्रार दिलास तर तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणुन टिन पत्राचे शेडचे नुकसान केले व जबरदस्तीने सोयाबीन घेवून गेले. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर रघुनाथ गीते, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती रा. प्रधान सांगवी ता. किनवट जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **मा. प्रथम वर्ग न्यायालय, किनवट यांचे आदेशाने कलम 156 (3) सी.आर.पी.सी. प्रमाणे पोस्टे बिलोली** गुरन 239/2022 कलम 395,427,323,504,506,34 भादवि सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री पवार, मो. नं. 9850892665** हे करीत आहेत.

## 3)वाहन चोरी :–

**1)देगलूर** :– दिनांक 30.11.2022 रोजी 20.00 वा. ते दिनांक 01.12.2022 रोजी 23.00 वा. चे दरम्यान, **तुकाराम नगरी सार्वजनिक रोडवर देगलूर ता. देगलूर जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीचा टिपर क्रं. टी.एस./12–युबी–7972 किमती 11,00,000/–रुपयाचा नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी बाालाजी अनिल हिंगमिरे वय 23 वर्षे, व्यवसाय चालक रा. एकलारा ता. मुखेड जि. नांदेड ह.मु. बापुनगर, देगलूर ता. देगलूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 545/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सुर्यवंशी, मो.क्र. 9821159844** हे करीत आहेत.

**2)लोहा** :– दिनांक 23.11.2022 रोजी 23.30 वा. ते दिनांक 05.12.2022 रोजी 12.30 वा. चे दरम्यान, **आश्रम शाळेजवळ कंधार रोड लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीचा हायवा टिपर क्रं. एम.एच./06–बीडब्ल्यु–1284 किमती 10,00,000/–रुपयाचा नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी हरी माधव पवार, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. जुना लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 238/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्रीमती काळे, मो.क्र. 9922391720** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**उमरी** :–दिनांक 08.12.2022 रोजी 05.30 वा. चे सुमारास, **मौजे हून्डा ता. उमरी जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीस फिर्यादीने तू माझ्या पत्नीस का बोलत बसलास असे म्हणाले वरुन आरोपीने शिवीगाळ करुन कुऱ्हाडीने फिर्यादीचे डाव्या पायाच्या फेन्ड्रीवर मारुन फॅक्चर करुन दुखापत केली व ढकलून खाली पाडून डोके फोडून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी देविदास नागोराव जाधव, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. हून्डा ग.प. ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 289/2022 कलम 325,504,323 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/1982 सरोदे, मो. नं. 9175743162** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)हदगाव :–** दिनांक 15.08.2015 पासुन ते दिनांक 30.09.2022 रोजी 12.00 वा. पावेतो, **मौजे बरडशेवाळा ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस चारित्र्यावर संशय घेवून अपनास्पद वागणुक देवून शिवीगाळ करुन माहेरहुन पन्नास हजार रूपये घेवुन ये म्हणुन मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 182/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पवार, मो.क्रं. 9503712588** हे करीत आहेत.

**2)इस्लापूर :–** लग्नाचे चार महिन्यानंतर ते दिनांक 08.07.2022 रोजीपर्यंत, **हडको नांदेड, ह. मु. कोल्हारी ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद तेरा आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस लग्नात दिलेले दागीने विकण्यासाठी तगादा लावला फिर्यादीने दागीने विकण्यास नकार दिल्याने शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व माणसीक छळ केला तसेच दागीने जबरदस्तीने विकून टाकले व माहेरहुन 25 हजार रुपये घेवून ये म्हणुन त्रास दिला. वगैरे **फिर्यादी 21 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापूर** गुरनं 118/2022 कलम 498(अ),323,504,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.क्रं. 9423438305** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड